||श्री राम समर्थ||
||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, फ्लॉवर, कोबी, खरबूज, कलिंगड, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९२ वा | गुरुवार, दि. ०५ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450

# अजितदादांच्या विमान अपघाताआधी काही लोकांकडून बारामती विमानतळाची रेकी

## रोहित पवारांच्या आरोपांनी खळबळ





**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जानेवारी महिन्यात बारामती येथे झालेल्या विमान अपघातात निधन झाले. अजित पवार यांच्या विमान अपघातावर संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार आणि अजितदादांचे पुतणे रोहित पवार या विषयावर सातत्याने पत्रकार परिषद घेत वेगवेगळे दावे करत आहेत.

बुधवारीही त्यांनी पत्रकार परिषद घेतली आणि अजितदादांच्या विमान अपघाताआधी काही लोकांनी बारामती विमानतळाची रेकी केली, असा खळबळजनक दावा केला.

काही लोकांशी बोलण्यावर समजलं आहे की, अजितदादा यांच्या विमान दुर्घटनेआधी विमानतळाची रेकी करण्यासाठी काही लोक आले होते. याचा तपास करण्याची गरज आहे. सीआयडी आणि सीआयबीने यात लक्ष घालावं, असे रोहित पवार म्हणाले. अजित पवारांचा दौरा पूर्वनियोजित नव्हता, तर रात्री ठरला होता. एकूण 90 टक्के इंधन भरलं होत. विमानाचं आयुष्य 85 तास राहिलं आहे असं आपण म्हटलं होतं. पण खरं पाहायचं तर 8000 पर्यंत गेलं होतं. म्हणजे अधिकृत वैधतेपेक्षा 3000 तास इंजिन पुढे गेलं होतं. रनवे 29 सोडून 11 वर लँड करण्याचा प्रयत्न झाला हेदेखील सिद्ध होत आहे. मुख्य पायलट काही बोलत नव्हता हे ट्रान्सक्रिप्टमध्ये दिसत आहे, असे रोहित पवार यांनी सांगितले आहे.

एखाद्या व्हीआयपीच्या किंवा कोणत्याही दुर्घटनेचा डोळ्यात तेल घालून तपास करण्याची गरज असते. अपघाता अहवाल बनवताना गडबड, चुका होऊ नये अपेक्षा होती. त्यांनी बारामतीला जिल्हा जाहीर केलं आहे. महापालिका आहे असं दाखवलं आहे. यातून एएआयबीचं गांभीर्य दिसत आहे, असेही रोहित पवार म्हणाले. तसेच पंखा डाव्या बाजूला झुकला होता, पण रिपोर्टमध्ये चुकलं आहे. म्हणजे गोळी कुठे लागली हे विचारलं तर डोक्यात लागली असताना यांनी छातीत लागली असं सांगितलं आहे.

रिपोर्टमध्ये विमान झाडाला धडकल्याची चर्चा असताना, झाडं सांगितली आहेत. अशी कुठली झाडं आहेत ज्यांना धडकून विमान खाली पडलं? विमान पडलं तिथे झाडं नसून, झुडपालाही स्पर्श झाला नव्हता. झुडपाची उंची आणि विमान पडल्याची उंची मॅच होताना दिसत आहे. द्यायचा म्हणून रिपोर्ट दिला. झाडांवर जबाबदारी टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न यांनी केला आहे, असे रोहित पवार म्हणाले.

मी व्हीएसआर, डीजीसीए विरोधात नाही. जो अपघात झाला ते विमान व्हीएसआरचं होतं. डीजीसीएच्या अंतर्गत तपास सुरू आहे. ॲरो नावाचे कंपनी, कर्मचारी, मालक या सगळ्या गोष्टींमध्ये गेल्याशिवाय खरं कळणार नाही. व्हीएसआर आणि ॲरो यांना मुद्दामून टार्गेट करत नाही. डीजीसीएमधील अधिकाऱ्यांनाही वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ताकदवान लोकांच्या मदतीने वाचवण्याचा प्रयत्न होत असेल तर तपास योग्य पद्धतीने होणार नाही. या सर्वांकडे क्रिमिनल आणि तांत्रिक दृष्टीने पाहावं लागणार आहे, असेही रोहित पवार म्हणाले.

# सोलापुरात शेतकऱ्यांनी कांदा लिलाव बंद पाडले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कांद्याची दरवाढ व अनुदानासाठी शेतकऱ्यांनी आंदोलन करत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा लिलाव बंद पाडले. गेल्या काही दिवसांपासून कांद्याची आवक वाढली असून, दर मात्र कमालीचे कोसळले आहेत.

यातून उत्पादन व वाहतूक खर्चही निघत नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सोलापूर जिह्यासह मराठवाडा व कर्नाटकातील शेतकरी कांदा विक्रीसाठी आणत आहेत. कांद्याची आवक वाढल्याने दर प्रतिक्विंटल 200 ते 800पर्यंत खाली आले आहेत. उत्पादन खर्च 2000च्या पुढे असताना शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य भाव दिला जात नसल्याने शेतकऱ्यांनी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर मोर्चा काढत लिलाव बंद पाडले. यावेळी शेतकऱ्यांच्या घोषणाबाजीने कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर दणाणून गेला होता. पोलिसांनी हस्तक्षेप करत शेतकऱ्यांचे आंदोलन काही काळ थांबविले.

शेतकऱ्यांच्या वतीने कांद्याला प्रतिक्विंटल 3000 रुपये हमीभाव जाहीर करावा, पीकविमा तत्काळ द्यावा, राज्यातील बाजार समितीमध्ये शेतकरी निवास सुरू करावे, हमीभाव आणि नुकसानीपोटी प्रतिक्विंटल 1000 रुपये अनुदान तत्काळ द्यावे, अशी मागणी करत निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड, शरद भालेकर, राम हाके, रामराव काटे, आबासाहेब नलगे, दत्तात्रय ठोंबरे, अप्पासाहेब मोरे यांच्यासह जिह्यातील शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

# माकप कडून इराणवरील हल्ल्यांच्या निषेधार्थ आक्रमक आंदोलन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** इराणवर सुरू असलेल्या लष्करी कारवायांच्या निषेधार्थ माकप तर्फे आज सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे तीव्र व आक्रमक जनआंदोलन आणि निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर तसेच जिल्हा सचिव कॉ युसुफ शेख मेजर यांनी केले.

माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांनी माध्यमांशी बोलताना म्हणाले की , इराणवर अमेरिका व इस्त्रायल यांनी केलेले हल्ले हे त्या देशाच्या सार्वभौमत्वावर उघड आक्रमण असून आंतरराष्ट्रीय कायद्याचे गंभीर उल्लंघन आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे मध्यपूर्वेतील तणाव तीव्र झाला असून जागतिक शांततेसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

माकपचा ठाम विश्वास आहे की युद्ध हा कोणत्याही समस्येचा उपाय असू शकत नाही. संवाद, मुद्देसूदगिरी आणि शांततापूर्ण चर्चेच्या माध्यमातूनच मतभेद सोडवले जावेत. लष्करी हस्तक्षेपामुळे निरपराध नागरिकांचे बळी जात आहेत, तेलाच्या किमती वाढत असून सर्वसामान्यांवर महागाईचा अतिरिक्त भार पडत आहे, असे त्यांनी नमूद केले.

आडम मास्तर यांनी केंद्र सरकारला आवाहन करताना सांगितले की, भारताने आपल्या स्वतंत्र व निर्भीड परराष्ट्र धोरणाची परंपरा जपत या हल्ल्यांचा स्पष्ट शब्दांत निषेध करावा व तात्काळ युद्धविरामासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढाकार घ्यावा. भारत हा शांतता, सहअस्तित्व आणि निर्गुट परंपरेचा पुरस्कर्ता देश असून त्याने ठाम युद्धविरोधी भूमिका जाहीर करावी.

### काळे झेंडे, घोषणाबाजी करत पुतळा दहन

जिल्हा परिषद पुनम गेट येथून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. कार्यकर्त्यांनी काळे झेंडे, काळी वस्त्रे व काळ्या फिती लावून घोषणाबाजी केली. 'युद्ध नको, शांतता हवी' अशा घोषणा देत निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेत्यांहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले.

## ट्रम्प आणि नेतान्याहू चे पुतळा दहन



**निदर्शनादरम्यान पुढील मागण्या मांडण्यात आल्या :**

1. इराणवरील सर्व लष्करी हल्ले तात्काळ थांबवावेत.
2. तातडीने युद्धविराम जाहीर करून शांततापूर्ण चचेर्ला सुरुवात करावी.
3. शांततेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर तोडगा काढावा.
4. भारत सरकारने स्पष्ट युद्धविरोधी भूमिका जाहीर करावी.
5. माकप हा शांतता, लोकशाही आणि जनतेच्या हक्कांसाठी लढणारा पक्ष असून आंतरराष्ट्रीय पातळीवर साम्राज्यवाद व आक्रमणवादाच्या विरोधात संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी काही हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलनात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला. मात्र माकप कार्यकर्त्यांनी ठाम भूमिका घेतल्याने संबंधित कार्यकर्ते मागे पळून गेले त्यानंतर पोलिस व माकप कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच झटापट झाली.

या आंदोलनात पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. एम. एच. शेख, नलिनी कलबुर्गी, नसीमा शेख, ॲड. अनिल वासम, दत्ता चव्हाण, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, विल्यम ससाणे, विक्रम कलबुर्गी, नरेश दुगाणे, दाऊद शेख, अकील शेख, मल्लेशाम कारमपुरी, अशोक बल्ला, वीरेंद्र पद्मा, सनी शेट्टी, बालकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, अभिजित निकंबे, रफिक काझी, वसीम देशमुख, आसिफ पठाण, प्रदीप मरेड्डी, तबसुम शेख, मोहन कोक्कुल, अफसाना बेग आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. अनिल वासम यांनी केले, तर पक्षाची अधिकृत भूमिका कॉ. एम. एच. शेख यांनी मांडली.

# विधानसभेत राडा! ठाकरे-भाजपचे आमदार भिडले, एकमेकांचा बाप काढला




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा अधिवेशनात आमदारांमध्येच राडा पाहायला मिळाला. भाजपचे सोलापूरमधील आमदार सचिन कल्याण शेट्टी आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे कोकणातील आमदार भास्कर जाधव यांच्यामध्ये विधानसभेत जोरदार भांडणं झाली.

दोन्ही नेत्यांमध्ये कोणत्या कारणामुळे वाद झाला? याबाबतची अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पण दोन्ही नेत्यांनी बाप काढल्याचे व्हिडिओत स्पष्ट दिसत आहे. दोन आमदारांचा विधानसभेतील वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विधानसभा पोर्चमध्ये दोन्ही नेत्यांमध्ये संवाद सुरू होता. त्यावेळी अचानक वादाची ठिणगी पडली. यावेळी बोलताना भास्कर जाधव यांची जीभ घसरली आणि त्यांनी 'बापाचा' उल्लेख केल्याने विधिमंडळातील वातावरण अधिकच तापले. आपल्या वडिलांविषयी काढलेल्या उद्गारांमुळे आमदार कल्याणशेट्टी प्रचंड आक्रमक झाले होते. त्यांनी तातडीने जाधवांना प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे दोन्ही नेत्यांमध्ये तू तू मैं मैं झाले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

भाजपाचे सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि उबाठा ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांच्यात विधानसभेत शाब्दिक चकमक झाली. राज्यपालांच्या भाषणावरून दोन्ही नेत्यांमध्ये तू तू मैं मैं झाल्याचे व्हिडिओत दिसत आहे. आम्ही काही चुकीचं केले नाही, असे भास्कर जाधव म्हणाल्याचे व्हिडिओत दिसतेय. तर सचिन कल्याण शेट्टी म्हणाले आम्ही सत्ताधारी पक्षाचे आमदार आहोत. आमचा बाप कशाला काढला? त्यावर भास्कर जाधव म्हणाले, असू द्या.. आणखी २ मंत्री आले तर मी घाबरत नाही. हे काम सरकारी नोकर कसे करू शकतात, असे ते म्हणाल्याचे दिसतेय.

भास्कर जाधव आणि कल्याण शेट्टी या आमदारांच्या हमरातुमरीमुळे विधिमंडळ पोर्च परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर उपस्थित इतर लोकांनी मध्यस्थी करत दोन्ही नेत्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. भास्कर जाधव घटनास्थळावरून निघून गेले. पण या प्रकारामुळे विधिमंडळात राडा होण्याची शक्यता आहे. भास्कर जाधव या प्रकारावर काय बोलणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये नेमकी कोणत्या कारणामुळे भांडणं लागली होती, हे अद्याप समोर आलेले नाही.

# कॉरिडॉरविरोधात पंढरपुरात कडकडीत बंद; तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पाच्या विरोधात सोमवारी (ता. २) पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला आणि तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

मंदिर परिसरातील बाधित नागरिक मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते.

महाद्वारातील नामदेव पायरी येथे माऊली महाराज शिरवळकर, वडगावकर महाराज, देहूकर महाराज आदींच्या हस्ते पूजन करून मोचार्ला सुरवात झाली. 'एकच जिद्द - कॉरिडॉर रद्द', 'जुलमी कॉरिडॉर रद्द करा' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

मोर्चेकऱ्यांची प्रमुख मागणी होती की, शहरात वापराविना पडलेल्या शासकीय जागा तसेच अतिक्रमित जागांवर कॉरिडॉरसारखे प्रकल्प राबवावेत. वारकरी बांधवांना सुविधा देणारी बाधितांची घरे पाडू नयेत आणि कॉरिडॉर सरकारी जागांवरच उभारावा.

मोर्चा तहसील कार्यालयाकडे जात असताना विविध चौकांमध्ये भाषणे झाली. शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात मोर्चा तहसीलदार कार्यालयात पोचला. यावेळी बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह इचगावकर, नगरसेवक राहुल शिंदे, नाईक किरण घाडगे, वडगावकर महाराज, शिरवळकर महाराज आदींनी आपली मते मांडली. मोर्चात महिलांचाही मोठा सहभाग होता. वट्टमवार ताई, डॉ. प्राजक्ता बेणारे, सौ. बिडकर आदींनी मनोगते व्यक्त केली.

कॉरिडॉरविरोधात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात बंद व महामोर्चा आयोजित करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. बाधित भागासह शहरातील विविध संस्था, संघटना आणि नागरिकांनी मोठा पाठिंबा दिला. राज्याच्या अर्थसंकल्पात कॉरिडॉरसाठी तरतूद होण्याची चर्चा असताना, पंढरपुरातून मोठा विरोध उभा राहिल्याचे चित्र दिसून आले.

मोर्चासाठी कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नानासाहेब कवठेकर, नगरसेवक ओंकार जोशी, रा. पां. कटेकर यांच्यासह विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. मोर्चा यशस्वी करण्यासाठी गणेश लंके, वैभव बडवे, अनिल गवळी, प्रशांत खंडागळे, यशवंत बेणारे, उंडाळे वकील आदींनी परिश्रम घेतले.



**'चंद्रभागेच्या पैलतीरावर कॉरिडॉर उभारावा'**

कॉरिडॉरविरोधी मोर्चात सहभागी झाल्यानंतर आमदार अभिजित पाटील म्हणाले, आमचा विकासाला विरोध नाही; मात्र हजारो लोकांचे विस्थापन करून घरे पाडण्यास नागरिकांचा तीव्र विरोध आहे. कॉरिडॉर उभारायचाच असेल तर चंद्रभागेच्या पैलतीरावर उभारावा. तेथे पूल बांधून भाविकांना दर्शनासाठी सोयीस्कर व्यवस्था करता येईल आणि मंदिर परिसरातील नागरिकांची घरे पाडावी लागणार नाहीत.

**'चंद्रभागेच्या पैलतीरावर कॉरिडॉर उभारावा'**

कॉरिडॉरविरोधी मोर्चात सहभागी झाल्यानंतर आमदार अभिजित पाटील म्हणाले, आमचा विकासाला विरोध नाही; मात्र हजारो लोकांचे विस्थापन करून घरे पाडण्यास नागरिकांचा तीव्र विरोध आहे. कॉरिडॉर उभारायचाच असेल तर चंद्रभागेच्या पैलतीरावर उभारावा. तेथे पूल बांधून भाविकांना दर्शनासाठी सोयीस्कर व्यवस्था करता येईल आणि मंदिर परिसरातील नागरिकांची घरे पाडावी लागणार नाहीत.

**'बाधितांवर अन्याय होणार नाही'**

कॉरिडॉर बाधितांच्या मागे आम्ही ठामपणे उभे आहोत. प्रशासनाशी अनेक वेळा संवाद झाला आहे. प्राथमिक प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून, त्यात आवश्यक बदल अपेक्षित आहेत. कोणत्याही परिस्थितीत बाधितांवर अन्याय होणार नाही. ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी करावे, असे आमदार समाधान आवताडे यांनी स्पष्ट केले.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# महापालिका आयुक्तांचा शहरात झंझावाती दौरा

## नालेसफाई, पाणीपुरवठा आणि शैक्षणिक दर्जाची प्रत्यक्ष पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नालेसफाई, ड्रेनेज लाईन आणि नागरी सुविधांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी सोलापूर महानगरपालिका आयुक्तांनी आज विविध प्रभागांचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन तांत्रिक सूचना दिल्या तसेच नागरिकांच्या समस्यांचे जागेवरच समस्या जाणून घेतल्या.



**दौरा क्रं १. प्रभाग क्र. २३: ड्रेनेज लाईन व पाणीपुरवठा सुधारणा**

जुळे सोलापूर येथील म्हाडा कॉलनी ते पनाश अपार्टमेंट दरम्यान टाकण्यात येणाऱ्या ड्रेनेज पाईपलाईनची आयुक्तांनी पाहणी केली. पाईपलाईन सलग न टाकता ठराविक अंतरावर 'मॅनहोल्स' (चेंबर) तयार करण्याचे आदेश दिले. प्रकल्पाच्या जागेतील अनधिकृत नर्सरींना तात्काळ नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले. नगरसेविका श्रीमती वनिता पाटील यांनी उपस्थित केलेल्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर रात्री ९ ते १२ (पान 2 वर..)

## संपादकीय

# युद्धामुळे भारतापुढे निर्माण होणारे प्रश्न

इराणने होर्मुझ समुद्रधुनी बंद केल्याने क्रूड व नैसर्गिक वायू आयातीपुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारत हा जगातील तिसरा तेल ग्राहक असून भारताकडे असलेला तेलसाठा अवघा 21 दिवस पुरेल इतकाच असल्याची माहिती आहे.

मध्यपूर्व आशियाच्या युद्धभूमीमध्ये अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या दरम्यान सुरू असलेल्या युद्धाचा भडका दिवसेंदिवस वाढतो आहे. मंगळवारी पाचव्या दिवशी या युद्धाची व्याप्ती अधिक वाढल्याने चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील तेल संकट अधिक गहिरे होत चालले आहे. इराणने तेल वाहतुकीच्या प्रमुख मार्गावर असलेली 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' ही समुद्रधुनी बंद केल्याने भारताचा तेल आयातीचा महत्त्वाचा मार्ग बंद झाला आहे. यामुळे भारतीय ऑईल रिफायनरीजना कच्च्या तेलाच्या पुरवठा पर्यायांचा विचार करणे भाग पडले आहे. यामध्ये अमेरिकेने रशियन तेल आयातीवर घातलेल्या निबंर्धाच्या अटींमुळे सध्या ऑईल रिफायनरीजना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

भारत हा जगातील तेल बाजारातील तिसऱ्या क्रमांकाचा ग्राहक म्हणून ओळखला जातो. भारतात प्रतिदिन एकत्रित पाच दशलक्ष बॅरल्स क्रूड ऑईलची आयात केली जाते. संसदेच्या सुरू असलेल्या अधिवेशनात केंद्रीय पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी यांनी देशात 74 दिवस पुरेल इतका कच्चे तेल व इंधनसाठा उपलब्ध असल्याची माहिती दिली होती. तथापि, ऑईल रिफायनरीज क्षेत्रातील सूत्रांच्या मते प्रत्यक्षात 20 ते 25 दिवस पुरेल इतकाच क्रूड ऑईलचा साठा भारतात उपलब्ध आहे.

आशियातील दोन प्रमुख ऊर्जा ग्राहक देश असलेल्या भारत आणि चीन या दोन्ही देशांचे सुमारे 50 टक्के कच्च्या तेलाचे आयात स्रोत पश्चिम आशियात आहेत. पश्चिम आशियात उत्पादित होणाऱ्या एकूण तेलसाठ्यांपैकी 90 टक्के तेलाचा विनियोग आशिया खंडात होतो. जपान, दक्षिण कोरिया, भारत, चीन या देशांची तेल आयात मोठी आहे. जपान आणि दक्षिण कोरिया हे देश अनुक्रमे 95 आणि 70 टक्के तेल पश्चिम आशियातून आयात करतात. तथापि, जपानकडे सध्या 254 दिवस पुरेल इतका, दक्षिण कोरियाकडे 208 दिवसांचा तेलसाठा उपलब्ध आहे, तर चीनकडे 180 दिवस पुरेल इतके तेल आहे. जागतिक स्तरावर अमेरिका-इराण यांच्या दरम्यान सुरू असलेले युद्ध शस्त्रसंधी होण्याऐवजी ते अधिक चिघळू लागले आहे. यामुळे मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात देशाला इंधनाचा पुरवठा कसा करावयाचा, याची चिंता भारतातील ऑईल रिफायनरीजना लागली आहे. या तेलाच्या पुरवठ्यामध्ये मोठा खंड पडला, तर झपाट्याने वाढणारा तेल ग्राहक देश म्हणून भारत सर्वाधिक असुरक्षित ठरू शकतो, असे विश्लेषकांचे मत आहे.

भारताला सद्यस्थितीत इंधनाची आयात करण्यासाठी भारतीय रिफायनरीजकडे तीन पर्याय आहेत. यामध्ये होर्मुझ समुद्रधुनीला वळसा घालून कच्च्या तेलाची पयार्यी आयात करणे, पश्चिम आफ्रिका, ओमान आणि अमेरिकेतील कच्चे तेल आयात करण्याचा दुसरा पर्याय आहे. शिवाय, जहाजावर लोड केलेले पण अद्याप गंतव्य बंदरावर पोहोचले नसलेले कच्चे तेल म्हणजेच 'ऑईल ऑन वॉटर' मागार्ने स्पॉट खरेदीचा तिसरा पर्याय आहे. या पयार्यांपैकी कोणता पर्याय किफायतशीर ठरतो, यावर भारताची इंधनाची आयात अवलंबून असेल. जागतिक बदलत्या भूराजकीय स्थितीत इंधनाची गंभीर समस्या सोडविण्यासाठी सोमवारी केंद्रीय पेट्रोलियम व वायू मंत्रालयामध्ये याविषयी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत प्रमुख पेट्रोलियन उत्पादनांची उपलब्धता आणि परवडणारी किंमत सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक सर्व ती पावले उचलली जातील, असे स्पष्ट करण्यात आले.

चीनकडे किमान सहा महिन्यांचा इंधनसाठा उपलब्ध असल्याने त्यांची बाब चिंतेची नसली, तरी भारतासाठी मात्र समुद्रधुनी बंद होणे ही सर्वात मोठी डोकेदुखी ठरली आहे. याखेरीज युद्धाची पहिली ठिणगी पडल्यापासून जागतिक बाजारात क्रूड ऑईलचे दर झपाट्याने वाढत आहेत. 65 डॉलर प्रतिबॅरलवर स्थिर असलेल्या क्रूड ऑईलचा आलेख युद्धाच्या पहिल्या सायरननंतर वाढण्यास सुरुवात झाली. शुक्रवारी ते 72 डॉलर्सवर गेले आणि सोमवारी ते 80 डॉलर्सपर्यंत झेपावले.

तेलाबरोबरच द्रवरूप नैसर्गिक वायूची आयातही ठप्प झाली आहे. भारत द्रवरूप नैसर्गिक वायूच्या आयातीमध्ये जगातील चौथ्या क्रमांकाचा आयातदार देश समजला जातो. देशाची 45 टक्के गरज आयातीवर अवलंबून आहे. प्रतिवर्षी सरासरी 22 ते 26 दशलक्ष मेट्रिक टन नैसर्गिक वायूची आयात भारतात केली जाते. युद्धाच्या पार्श्वभूमीवर कतारने द्रवरूप नैसर्गिक वायूचे उत्पादन थांबविले आहे. याशिवाय पश्चिम आशियातील तेल व वायू प्रकल्पांमध्येही खबरदारीचे उपाय म्हणून कामकाज अंशतः बंद करण्यात आले आहे. याखेरीज सौदी अरेबियातील पर्शियन आखात किनाऱ्यावरील रस्तनुरा येथील सर्वात मोठ्या 'सौदी अरामको' या रिफायनरीला इराणने लक्ष्य केल्यानंतर तेथील कामकाजही थांबविले आहे. भारताची नैसर्गिक वायूची 83 टक्के आयात ही होर्मुझ समुद्रधुनीतून होते. हा मार्ग दीर्घकाळ बंद राहिला, तर पश्चिम एशियातून येणाऱ्या कार्गोना 'केप ऑफ गुड होप'मार्गे लांबचा वळसा घालून प्रवास करावा लागू शकतो.

युद्धाच्या या पार्श्वभूमीवर अमेरिकेने भारताला रशियन तेल खरेदीसाठी सवलत द्यावी, असाही एक प्रयत्न सुरू आहे. भारताने अमेरिकेबरोबर केलेल्या करारात टॅरिफ कमी करताना रशियन तेल आयात पूर्णतः थांबविण्याची अट घातली होती. असे तेल खरेदी झाले, तर 25 टक्क्यांचे टॅरिफ पुन्हा लागू करण्यात येईल, अशी धमकी अमेरिकेने दिली होती; परंतु प्राप्त स्थितीत भारताजवळ तेल आयातीचे मर्यादित पर्याय आहेत. ही स्थिती लक्षात घेऊन अमेरिकेने युद्ध काळादरम्यान रशियन तेल खरेदीची सवलत दिली, तर भारताला दिलासा मिळू शकतो. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भारताला तेल आयातीविषयी जेवढी चिंता आहे, त्यापेक्षा तेल उपलब्ध झाल्यास त्याच्या दरवाढीची अधिक चिंता आहे. कारण, युद्धामुळे एकीकडे क्रूडच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असतानाच मध्यपूर्व आशिया रणभूमी बनल्यामुळे तेलाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. यामुळेच जागतिक बाजारात क्रूड ऑईलचे भाव झपाट्याने वाढत आहेत. या वाढीव दराच्या तेल खरेदीने भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढू शकतात. परिणामी, नियंत्रणात असलेली महागाई नियंत्रणाबाहेर जाऊ शकते. अर्थात, 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' ही समुद्रधुनी दीर्घकाळ बंद राहणे इराण वगळता कोणाच्याच फायद्याचे नाही. यामुळे अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यामध्ये किती आणि कसा हस्तक्षेप करून होर्मुझ समुद्रधुनी जलवाहतुकीसाठी खुली करतात, यावर भारतावरील तेलसंकट आणि देशाचे अर्थकारणही अवलंबून असणार आहे.

पान १ वरून

## महापालिका आयुक्तांचा शहरात...

ही पाणी सोडण्याची सुधारित वेळ करू असे आयुक्तांनी सांगितले. . या दौऱ्यावेळी उपमहापौर श्रीमती देवकर यांच्या विनंतीनुसार येथे देशी वृक्ष लागवडीच्या सूचनाही देण्यात आल्या. . या दौऱ्यावेळी उपमहापौर सौ.ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका श्रीमती वनिता पाटील, विभागीय अधिकारी श्री. तळखडे, नगर अभियंता विभाग प्रमुख श्रीमती सरिता आकुलवार व इतर अभियंता उपस्थित होते.

# जीवनाचे गणित बिघडू देऊ नका !

लाखो-करोडो वर्षांपूर्वीचा आदिमानव आजच्या आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या प्राणीमात्रांसारखाच जगत असावा. त्याला फारशी जाणीव नव्हती; तो असंस्कृत होता. सकाळी झोपेतून उठल्यापासून अंधार पडेतो तो इतर प्राण्यांप्रमाणे भटकत असे. त्याला कुटुंबाची जाणीव नव्हती, ना येणाऱ्या पिढ्यांची काळजी.

पुढे शेतीचा शोध लागला, कुटुंबव्यवस्था निर्माण झाली आणि माणसाने आपली ठराविक दिनचर्या आखली. सकाळी न्याहारी करून शेतात जाणे, दिवसभर कष्ट करणे, संध्याकाळी दमून घरी परत येणे—येता-येता शेतातील भाजीपाला, फळे, कंदमुळे आणणे, बाजारातून जीवनावश्यक वस्तू घेऊन येणे—हे सर्व तो कुटुंबवत्सल भावनेतून करत होता. गाव, बाजार, दळणवळण यांची निर्मिती झाली आणि माणूस अधिक हुशार होत गेला. औद्योगिक क्रांतीनंतर तर त्याने आपले जीवन अधिक सुखी आणि समृद्ध करायला हवे होते; परंतु तसे झाले नाही. आजही प्रत्येक माणूस प्रगती करू शकलेला नाही. सुख, समाधान आणि नवचैतन्य प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत नाही.

मेंदूचा विकास होऊन मानवाने भौतिक, जैविक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक आणि आध्यात्मिक प्रगती साधली; तरीही काहीजण आपला मेंदू जाणीवपूर्वक बधिर ठेवण्याचा प्रयत्न का करतात? दारू, गांजा यांसारख्या नशायुक्त पदार्थांचे सेवन करून विकसित मेंदू बंद पाडण्याचा हट्ट का धरतात? असे करून त्यांना जीवनाचे गणित बिघडवायचे आहे का?

पैसा हा विनिमयाचे साधन आहे. तो जुगार, मटका, लॉटरी यांवर लावून जिंकणे किंवा हरणे यात कोणता आनंद मिळत असेल? "पैसा कष्टाने कमवावा!" हा नियम सर्वमान्य असतानाही चोरी, भ्रष्टाचार, लूटमार का केली जाते? यातून जीवनाचे गणित बिघडत आहे, हे का समजत नाही?

अनैतिकता ही जंगलीपणाचाच एक प्रकार आहे, हे कळूनही माणूस का वासनाधिन बनतो? अनेक व्यक्तींशी अनैतिक संबंध ठेवणे ही विकृती आहे, हे ठाऊक असूनही त्याकडे दुर्लक्ष का करतो? महिलांना तोकड्या कपड्यांत झगमगत्या प्रकाशात नाचवून पुरुषांना कोणता आनंद मिळतो? मावा, गुटखा यांसारखे आरोग्यास अपायकारक पदार्थ सेवन करून रस्त्यावर थुंकणे ही कोणती उंची आवड आहे ? यातून आपल्या जीवनाचे गणित बिघडत आहे, हे कधी ध्यानात येत नाही का ?

बुलेटसारख्या गाड्यांचे सायलेन्सर बदलून मोठमोठ्याने आवाज करत वेगाने गाड्या पळवून कोणते पदक मिळते? दोन संघ क्रिकेट खेळत असताना त्यावर पैसे लावून स्वतःच्या घरादाराचीराखरांगोळी करण्यात कोणता उच्च आनंद आहे? दुसऱ्यावर हुकूमत गाजवण्यासाठी, आपली दहशत बसवण्यासाठी हिंसाचार करून गुन्हेगारी जीवन जगण्यात काय मजा आहे ? यातून आपल्या जीवनाचे गणित बिघडते हे ध्यानात घेतलेच पाहिजे!

विज्ञान सांगते की मेंदूमध्ये डोपामिनसारखे रसायन स्त्रवते आणि त्यातून क्षणिक आनंद मिळतो. पण त्या क्षणिक आनंदासाठी आयुष्याची शाश्वत शांती गमावणे योग्य आहे का? आपण करत असलेल्या कृतींचे परीक्षण, चिंतन आणि परिशीलन माणूस का करत नाही? माणसाच्या वागण्याला, बोलण्याला आणि जीवनाला मयार्दा उरल्या नाहीत, असे का वाटते? एकाने चूक केली म्हणून दुसऱ्यानेही तशीच चूक करून अनैतिकतेची खोली वाढवणे योग्य आहे का?

शेवटी, जीवनाचे गणित बिघडू न देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. हे गणित १+१=२ इतके सोपे आहे. पण १+१=११, १११, ११११... अशी अवास्तव उत्तरे मिळवण्याच्या हव्यासात आपण आयुष्यच बरबाद करत आहोत. क्षणिक आनंदापेक्षा दीर्घकालीन समाधान महत्त्वाचे आहे. विवेक, संयम आणि नैतिकतेच्या आधारावरच जीवनाचे खरे गणित जुळते. अन्यथा प्रगतीच्या नावाखाली आपण पुन्हा आदिमानवाच्या पातळीवर जाऊ.



- किशोर जाधव, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# ई-चलन दंडावर जाहीर ५०% सूट तात्काळ लागू करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील ई-चलन दंडावर जाहीर करण्यात आलेली ५० टक्के सूट तात्काळ लागू करावी, अशी मागणी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने राज्य सरकारकडे केली आहे. हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री यांनी १० डिसेंबर २०२५ रोजी ई-चलन दंडावर ५० टक्के सवलत देण्याची घोषणा केली होती. मात्र अद्याप त्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसल्याने वाहनचालकांमध्ये नाराजी वाढत आहे.



महासंघाचे प्रदेश अध्यक्ष रियाज सय्यद यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, राज्यातील लाखो वाहनचालकांनी मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचे स्वागत केले होते. शासनाकडून तातडीने निर्णयाची अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात अद्याप कोणताही अधिकृत शासन निर्णय (जीआर) प्रसिद्ध झालेला नाही.

दरम्यान, 'मार्च एंड'च्या पार्श्वभूमीवर वाहतूक शाखेमार्फत प्रलंबित ई-चलन दंड वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आल्याचे दिसून येत आहे. यामुळे ऑटो रिक्षा, टॅक्सीचालक तसेच सर्वसामान्य वाहनधारक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनेक चालकांवर हजारो रुपयांचा दंड प्रलंबित असून सवलतीची अंमलबजावणी न झाल्याने त्यांना पूर्ण रक्कम भरण्याचा दबाव सहन करावा लागत आहे.

महासंघाने स्पष्ट केले आहे की, हिवाळी अधिवेशनात जाहीर केलेली ५० टक्के सूट तात्काळ लागू करावी आणि तोपर्यंत सुरू असलेली दंड वसुली मोहीम तात्पुरती स्थगित करावी. अन्यथा राज्यभरातील चालकांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मागार्ने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

वाहतूक क्षेत्रातील वाढते इंधनदर, विमा हप्ते, परवाना शुल्क आणि इतर खर्च यामुळे चालक वर्ग आधीच आर्थिक तणावाखाली आहे. अशा परिस्थितीत ई-चलन दंडावरील सवलतीची अंमलबजावणी लांबणीवर टाकणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे मत आहे.

राज्य सरकारकडून याबाबत अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नसून, येत्या काही दिवसांत शासन निर्णय जाहीर होतो का, याकडे वाहनचालकांचे लक्ष लागले आहे.

# कोकणातील हापूसवर नैसर्गिक आपत्तीचा घाला; उत्पादनात ९० टक्क्यांपर्यंत घट

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** महाराष्ट्रासह देश-विदेशातील खवय्यांच्या पसंतीस उतरलेला कोकणचा ह्यहापूसह्न यंदा मोठ्या संकटात सापडला आहे. अवकाळी हवामान बदल, उष्णतेची तीव्र लाट आणि मोहोर करपण्याच्या प्रकारामुळे यंदा आंबा उत्पादनात तब्बल ९० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे चित्र समोर आले आहे. परिणामी आंबा बागायतदार शेतकरी पूर्णतः आर्थिक अडचणीत सापडला आहे. कोकणातील आंबा म्हटला की सर्वप्रथम नाव घेतले जाते ते कोकण पट्ट्याचे. विशेषतः रत्न ागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील हापूस आंब्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी असते. मात्र यंदा मोहोर येण्याच्या टप्प्यातच तो करपल्याने फळधारणा अत्यल्प झाली आहे.



आंबा बागायतदारांनी एकरी दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत खर्च केला असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. खते, पाणी व्यवस्थापन, कीटकनाशकांची फवारणी, मजुरी आणि देखभाल यावर मोठा खर्च झाला. मात्र उत्पादनच नसल्याने हा सर्व खर्च पाण्यात गेल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. अनेक बागायतदार कर्जबाजारी होण्याच्या मार्गावर असून काही ठिकाणी बँक व खासगी सावकारांचे हप्ते थकण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

राज्याच्या फलोत्पादन विभागाने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागांचा पाहणी दौरा करून सादर केलेल्या प्राथमिक अहवालात ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत उत्पादन घट झाल्याचे नमूद केले आहे. हा अहवाल शासनासाठी धोक्याची घंटा मानला जात आहे.

हापूस आंबा हा केवळ फळ नसून कोकणच्या अर्थचक्राचा कणा आहे. वाहतूक, पॅकिंग, निर्यात, प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक बाजारपेठ यावर हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. उत्पादन घटल्याने संपूर्ण साखळीवर परिणाम होणार आहे. या पार्श्वभूमीवर आंबा बागायतदारांच्या शिष्टमंडळाने गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांची चिपळूण येथील शासकीय विश्रामगृहात भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. विधानसभा सभागृहात हा प्रश्न पोटतिडकीने मांडण्याचे आश्वासन त्यांनी दिले. राज्य सरकारने तातडीने मदत जाहीर न केल्यास कोकणातील आंबा बागायतदारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून सभागृहाबरोबरच रस्त्यावर उतरूनही लढा देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली.

शेतकऱ्यांकडून तातडीच्या आर्थिक मदतीची, कर्जमाफीची तसेच विशेष पॅकेज जाहीर करण्याची मागणी होत आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आंबा बागांसाठी दीर्घकालीन संरक्षण योजना आणि विमा संरक्षण अधिक प्रभावी करण्याचीही गरज व्यक्त होत आहे.

हापूसच्या सुगंधाने दरवळणारा कोकण यंदा चिंतेच्या छायेत आहे. शासनाने त्वरित सकारात्मक भूमिका घेतली नाही तर या संकटाचे पडसाद केवळ कोकणापुरते मर्यादित न राहता राज्याच्या अर्थव्यवस्थेवरही उमटू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल व गॅसचा पुरेसा साठा

## नागरीकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा कोणताही तुटवडा निर्माण होणार नाही, याबाबत जिल्हा प्रशासनाने ठोस उपाययोजना केल्या आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या निर्देशानुसार आज जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी Indian Oil Corporation Limited (IOCL), Bharat Petroleum Corporation Limited (BPCL) व Hindustan Petroleum Corporation Limited (HPCL) या तीनही तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सची तातडीची बैठक घेऊन इंधन साठा व पुरवठा याबाबत सविस्तर आढावा घेतला. व सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी इंधन पुरवठ्याच्या अनुषंगाने कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये. जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले.

पाकणी डेपो येथील तिन्ही कंपन्यांच्या ऑइल डेपो मॅनेजर्ससोबत चर्चा करून डिझेल-पेट्रोल साठ्याची स्थिती व इंधन वितरणाची तयारी याची खात्री करण्यात आली. तसेच जिल्ह्यात कुठेही तुटवडा भासणार नाही, याबाबत संबंधित कंपन्यांकडून लेखी आश्वासनही प्रशासनाने घेतले आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी नागरिकांना आवाहन केले की, आपल्या वाहनासाठी आवश्यक तेवढेच पेट्रोल-डिझेल भरावे. अतिरिक्त साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनास सहकार्य करावे. दरम्यान, सर्व पेट्रोल-डिझेल वितरकांना आवश्यक तेवढाच पुरवठा करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ड्रममधून इंधन वितरण होत असल्याच्या तक्रारी आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

शासकीय वाहनांसाठी आवश्यक राखीव साठा ठेवण्याच्या सूचना कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, जिल्ह्यात एलपीजी गॅसचाही कोणताही तुटवडा नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले असून गॅस कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबतही याबाबत आढावा घेण्यात आला आहे.

'सोलापूर जिल्ह्यात इंधन व गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही परिस्थितीत तुटवडा होऊ देणार नाही. नागरिकांनी अफवांना बळी न पडता प्रशासनावर विश्वास ठेवावा,' असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

# सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दिनांक 4 मार्च 2026 रात्री 20.00 वाजलेपासून ते दिनांक 18 मार्च 2026 रात्री 20.00 वाजेपर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पालीस अधिनियम कलम 37 (1) (अ ते फ) व कलम 37 (3), अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. असे अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार समाजकंटक व गुंडप्रवृत्ती इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोयीचे होईल तसेच शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

## वात्रटिका

### महागाईचा डोंब

पेचात आहे इथे जो तो
कोणाला येतो कळवळा...
तिकडे लागली आग आणि
इकडे मात्र त्याच्या झळा...
आधीच का कमी आहे
आमचेच इथले सोंग...
आणि उसळणार म्हणे
महागाईचा आगडोंब...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# लावणी नृत्य स्पर्धेत नटरंग सांस्कृतिक कला केंद्र प्रथम

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती शंकरनगर - अकलूज यांच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत नटरंग सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी मोडनिंब जि. सोलापूर या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रोख रुपये तीन लाख व सन्मानचिनह देऊन गौरविण्यात आले.

स्मृती भवन शंकरनगर येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या १०८ व्या जयंती निमित्त दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च या कालावधीत राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले होते.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी आमदार दिलीप सोपल, जयंती समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, स्पर्धा समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील, परीक्षक डॉ. शशिकांत चौधरी, प्रा.चं.वी. जोशी, प्रा. मधुकर गायकवाड, सहकार महर्षी कलावंत पुरस्कर्ते पांडुरंग घोटकर, रेश्मा परितेकर, प्रमिला लोदगेकर यांचे सह थिएटर मालक, कलाकार व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेतील रुक्मिणी अर्चना जोत्स्ना वाईकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र, वेळे (ता. वाई जि. सातारा) आणि प्रिया नगरकर न्यु अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी यवत-चौफुला (जि पुणे) या संघांनी विभागून द्वितीय क्रमांक पटकावला.त्यांना प्रत्येकी रोख रुपये दोन लाख व सन्मानचिन्ह देण्यात आले. तर वैशाली समसापूरकर जय अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी (जि पुणे) या संघाने तृतीय क्रमांकासह रोख रुपये एक लाख व सन्मानचिन्ह पटकावले.



> कलावंत हा टाळ्यांचा भुकेला असतो तो आत्मविश्वासाने व ताकतीने आपली कला रंगमंचावर सादर करत असतो. रसिकांनीही त्यांना भरभरून दाद दिली पाहिजे.
>
> **-जयसिंह मोहिते पाटील**
> संस्थापक अध्यक्ष

अलंकार सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी सुपा (जि. अहिल्यानगर) यांनी चतुर्थ क्रमांक, आणि वैष्णवी कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, अंबप-वाठार (जि. कोल्हापूर) व अपर्णा किर्ती नगरकर लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी (जि पुणे) यांनी विभागून पाचवा क्रमांक पटकावला.

तर वैयक्तिक बक्षिसा मध्ये उत्कृष्ट मुजरा रु.३ हजार नटरंग सांस्कृतिक कला केंद्र, ग्रुप पार्टी मोडनिंब (जि सोलापूर), उत्कृष्ट गायिका राखी चौरे, उत्कृष्ट ढोलकी वादक राहुल जावळेकर, उत्कृष्ट हार्मोनियम वादक-अनिकेत साळुंखे अंबप-वाठार यांना प्रत्येकी रु. एक हजार व सन्मान चिन्ह देऊन उपस्थितांच्या हस्ते गौरविण्यात आले.

परीक्षक डॉ.चं.वी. जोशी म्हणाले, मागील अनेक वर्षापासून जयसिंह मोहिते पाटील यांनी ही लोककला जपली आहे. डॉ. शशिकांत चौधरी म्हणाले, कलाकारांचे राबणं, नर्तन, व्यथा वेदना व श्रमाचे चीज व्हावे यासाठी मागील ३० वर्षापासून लावणी स्पर्धेचे हे शिवधनुष्य जयसिंह मोहिते पाटील यांनी पेलेलं आहे. टाळ आणि चाळ, भक्ती आणि शृंगार या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून यातून महाराष्ट्र उजळला आहे.

दोन दिवसाच्या स्पर्धा कालावधीत अनेक ज्येष्ठ व नवकलाकारांनी जयसिंह मोहिते पाटील यांना लावणी क्षेत्रातील योगदानाबद्दल शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांच्या कायार्चा गौरव करावा अशी इच्छा व्यक्त केली. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी राजकुमार पाटील यांनी केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटिंग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# रंजिता चाकोते यांची स्थायी समिती सभापतीपदी बिनविरोध निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या राजकारणात भारतीय जनता पक्षाने आपली पकड पुन्हा एकदा घट्ट केली आहे. अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती सभापतीपदी भाजपच्या रंजिता चाकोते यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. या पदासाठी केवळ चाकोते यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली. या विजयामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक आमदारांचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

राजकीय वर्चस्व अबाधित



या निवडीमुळे सोलापूरच्या राजकारणात पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या गटाचे महापालिकेतील वजन वाढले असल्याचे मानले जात आहे. पक्षांतर्गत रणनीती यशस्वी ठरवत भाजपने चाकोते यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले, ज्यामुळे विरोधकांना कोणतीही चाल रचण्याची संधी मिळाली नाही.

स्थायी समितीचे महत्त्व महानगरपालिकेच्या कामकाजात स्थायी समितीला 'सर्वात शक्तिशाली' मानले जाते.

अर्थसंकल्पः पालिकेच्या बजेटला अंतिम स्वरूप देणे.

विकासकामेः शहरातील मोठ्या विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी देणे. आर्थिक निर्णयः प्रशासकीय खर्चावर नियंत्रण आणि मंजुरी. रंजिता चाकोते यांच्या निवडीनंतर आता आगामी काळात शहरातील विकासकामांना किती गती मिळते आणि सत्ताधारी भाजप जनतेच्या अपेक्षा कशा पूर्ण करते, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# रक्तदान करून एखाद्याचा जीव वाचवल्याची भावना मनाला समाधान देते- डॉ.बाळासाहेब निकम

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते अपघाती रुग्णाचे शस्त्रक्रिया दरम्यान गरजूंचे प्राण वाचून त्यांना नवीन आयुष्य मिळते रक्तदान करून आपण एखाद्याचा जीव वाचवल्याची भावना मनाला खूप सकारात्मक आणि मानसिक समाधान देत असल्याचे मत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब निकम यांनी व्यक्त केले.



रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी
डॉ.अजित गांधी, प्र.प्राचार्य डॉ.बाळासाहेब निकम व इतर

ते नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय येथे महाविद्यालयाचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ.धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन ब्लड बँकेचे मेडिकल ऑफिसर डॉ.अजित गांधी, प्र.प्राचार्य डॉ.बाळासाहेब निकम, कार्यालयीन प्रमुख एच. टी.वाघमोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र.प्रा.डॉ.बाळासाहेब निकम, प्रा.डॉ.डी.एस.थोरात, प्रा. हसन मोगल, प्रा. विजय धाईंजे,प्रा. डी.के.साठे, प्रा.बापूराव वाघमोडे, प्रा.डॉ.संभाजी बनसोडे,प्रा.अजित भोपळे, प्रा.सचिन पवार, प्रा. समाधान चव्हाण, प्रा.सचिन शेंडे, प्रा. शरयू बडवे,सूर्यकांत सालगुडे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, यांनी रक्तदान करून डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. स.म.शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँक अकलूज येथील डॉक्टर व कर्मचारी यांनी रक्त संकलन करून घेतले. रक्तदान शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी ,प्रा.जगदीशचंद्र मुळीक, प्रा.उत्तम सावंत,तसेच प्रा.श्रीकांत पवार, प्रा डॉ. दत्तात्रेय शहाणे यांनी परिश्रम घेतले. रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक प्राध्यापिका तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# लोककल्याणकारी राजे छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रवादीच्या वतीने अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रयतेच्या कल्याणासाठी स्वराज्याची उभारणी करणारे आणि जनतेच्या मनामनात स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ शूर योद्धे नव्हते, तर लोककल्याणकारी आणि न्यायनिष्ठ राज्यव्यवस्थेचे दूरदर्शी प्रणेते होते. अन्याय, अत्याचार आणि परकीय सत्तेविरुद्ध त्यांनी उभारलेला संघर्ष हा फक्त सामर्थ्याचा नव्हे, तर स्वत्व, सन्मान आणि अस्मितेचा लढा होता. हिंदवी स्वराज्य संस्थापक युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजीमहाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्यास



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि छत्रपती शिवाजीमहाराज की जय अशा घोषणा देत सर्वांना शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश सचिव आनंद मुस्तारे माजी सभागृह नेते मगबुल मोहळकर जेष्ठ नेते हेमंत चौधरी जेष्ठ नेते श्रीनिवास कोंडी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले लिगल सेल अध्यक्ष जयप्रकाश भंडारे चित्रपट सांस्कृतिक विभाग अध्यक्ष आशुतोष नाटकर सोशल मिडीया कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे वैद्यकीय मदत कक्ष बसवराज कोळी अमोल कळम निशांत तारानाईक आदी उपस्थित होते.

# एनबीएन सिंहगडमध्ये दोन दिवसीय 'नवोन्मेषकांचा प्रशिक्षण शिबिर' यशस्वी संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या नवोन्मेष, उद्योजक घडवणूक (इन्क्युबेशन) आणि संलग्नता विभाग (IIL) या



विभागाच्या वतीने तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांच्या सहकार्याने 'Bootcamp for Innovators' हा दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दि. 27 व 28 फेब्रुवारी रोजी उत्साहात संपन्न झाला. या बूटकॅम्पचे आयोजन महाविद्यालयाच्या ईएनटीसी सेमिनार हॉल, ग्रंथालय इमारत येथे करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष, उद्योजकता व स्टार्टअप संस्कृती विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात प्र. कुलगुरू डॉ . एल बी दामा यांनी मार्गदर्शन करीत असताना शहर आणि जिल्हा याचा सुवर्णमध्य म्हणजे सिंहगड इन्स्टिट्यूट असल्याने हा कार्यक्रम येथे आयोजित केल्याचे सांगत कौतुक केले. यावेळेस सोलापूर विद्यापीठाचे तसेच पीएम उषाचे समन्वयक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनीही मार्गदर्शन केले. यावेळेस कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले यांची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण विचार, संशोधन व उद्योजकतेकडे वळण्याचे आवाहन केले. यावेळेस उद्योगवर्धिनीच्या सर्वेसर्वा चंद्रीकाताई चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाविषयी, बाजारपेठेतील मागणीसह करिअर क्षेत्रातील विविध संधींवर मार्गदर्शन केले. पहिल्या दिवशी डिझाईन थिंकिंग, उद्योजकता तसेच प्रोटोटाइप ते मार्केटिंग व डेव्हलपमेंट या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आले. वॉलचंद कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड सायन्स, सोलापूर येथील तज्ज्ञ प्राध्यापक डॉ . अनिलकुमार कट्टी, अर्चना इंजल, डॉ. वैशाली यारगडे यांची सत्रे झाली. सत्रात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दुसऱ्या दिवशी बौद्धिक संपदा हक्क (IPR) या विषयावर प्रा. शशिकांत हिप्परगी यांनी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे सादरीकरण केले. या सत्रातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला योग्य दिशा व व्यासपीठ मिळाले. समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे उद्योग, स्टार्टअप व संशोधन क्षेत्रात करिअर घडविण्यास प्रेरणा मिळत असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक समिती, मार्गदर्शक व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनामुळे व प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या सातत्यपूर्ण पाठबळामुळे मर्यादित कालावधीतही हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा. एम के जाधव यांनी केले. कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. सुनिल शाखापुरे यांनी काम पाहिले.

**नियोजनावर समाधान**

उपकुलसचिव डॉ. एल बी दामा यांनी कमी वेळेत सिंहगड इन्स्टिट्यूटने केलेल्या नियोजनावर समाधान व्यक्त केले. शहर आणि जिल्हा यांचा समन्वय साधावा म्हणून सिंहगडला प्राधान्य दिल्याचे सांगत लवकर सिंहगडवर आणखी एक उपक्रम सोपवला जाणार असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशीच्या समारोपात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# चित्राज सिटी साईड रिसॉर्ट - सोलापूरच्या पर्यटनाला नवी चालना देणारे- धीरज जवळकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील हॉटेल चित्रा एक्झिक्युटिव्ह हे आपल्या सेवेत गेल्या पाच वर्षापासून कार्यरत आहे. ग्राहकांच्या समाधानाला आणि सेवेला प्राधान्य देत आम्ही उत्कृष्ट सुविधा आणि सेवा देण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. यापुढेही सेवा देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.



हॉटेल चित्रा एक्झिक्यूटिव्हच्या यशस्वीतेनंतर खास सोलापूरकरांसाठी एक भेट जे उत्तर सोलापूर येथील अकोलेकाटी, कोंडी - अकोलेकाटी रोड येथे चित्रज सिटी साईड रिसॉर्टच्या माध्यमातून जवळकर परिवार देत आहेत.

तसेच सोलापूर जिल्ह्यात पर्यटन विकासाला चालना देणे, पर्यटकांना दजेर्दार सेवा प्रदान करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे संचालक धीरज जवळकर यांनी सांगितले.

नैसर्गिक सौंदर्य, शांत, सुरक्षित आणि अल्हाददायक वातावरण चा अनुभव सोलापूरकरांना देण्यासाठी चित्राज सिटी साईड रिसॉर्ट ची निर्मिती करीत असल्याचे हॉटेल चित्रा चे संचालक धीरज जवळकर यांनी सांगितले.

चित्राज सिटी साईड रिसॉर्ट हे अत्यंत निसर्गमय वातावरण असून सोलापूर शहरापासून केवळ 15 किलोमीटर अंतरावर असलेल्या अकोलेकाटी, कोंडी - अकोलेकाटी रोड येथे उभे आहे. याचे उद्घाटन 7 मार्च रोजी सायंकाळी 07.00 वा. मातोश्री श्रीमती रंजना रमेश जवळकर यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असल्याचे संचालक धीरज जवळकर यांनी सांगितले.

सोलापूरच्या वैभवात भर घालणारी ही वास्तू, प्रशस्त आधुनिक रिसॉर्ट असून या मध्ये 80 रूम्स, सात हजार स्क्वेअर फुटचे बँक्वेट हॉल, 40 हजार स्क्वेअर फुट चे सर्वात मोठे लॉन, सोबत 12 हजार स्क्वेअर फुट चे छोटे लॉन, तसेच वॉटर पार्क, एडवेंचर पार्क, व्ही.आर. गेम्स, आर्केड गेम्स, इनडोअर आणि आउटडोअर गेम्स, रेन डान्स असे बरेच काही अत्याधुनिक सुविधा या रिसॉर्ट मध्ये उपलब्ध आहेत.

पुढे बोलताना धीरज जवळकर म्हणाले की लोकांना दजेर्दार सुविधा आणि सेवा हवी आहे, म्हणून आम्ही सिटीसाईड रिसॉर्ट मध्ये प्री - वेडिंग शूट, एंगेजमेंट, डेस्टिनेशन वेडिंग, कार्पोरेट प्रोग्रॅम्स, फॅमिली ट्रिप्स सह लग्न समारंभासाठी जवळजवळ 3000 लोकांची व्यवस्था असलेले मोठे लॉन उपलब्ध करून दिलेला आहे.

अशा या अनोख्या आणि अत्याधुनिक सुविधेने नटलेल्या अकोलेकाटी, कोंडी - अकोलेकाटी रोड येथे उभ्या असलेल्या चित्राज सिटी साईट रिसॉर्टला एक वेळ अवश्य भेट द्यावे असे आवाहन संचालक धीरज रमेश जवळकर, चित्रा धीरज जवळकर, कुणाल धीरज जवळकर यांनी केले आहे.

# जयसिंह मोहिते पाटील यांना पद्मश्री पुरस्कार मिळावा यासाठी शासन दरबारी प्रयत्न करेन- आ. दिलीप सोपल

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** लावणी कलावंतांना शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी केली होती. तर लावणीतील अनेक कलावंतांनी लावणीच्या योगदानाबद्दल जयसिंह मोहिते पाटील यांना पद्मश्री पुरस्कार द्यावा अशी मागणी केली आहे. लोकप्रतिनिधी म्हणून या दोन्ही मागण्यासाठी मी शासन दरबारी प्रयत्न करेन असे आमदार दिलीपराव सोपल यांनी सांगितले.



स्मृतिभवन शंकरनगर येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत दुसऱ्या दिवशीच्या सादरीकरणा वेळी आमदार दिलीप सोपल बोलत होते.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,पद्मश्री पुरस्कार प्राप्त कलावंत रघुवीर खेडकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, स्पर्धा समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांचे सह लावणी कलावंत व राज्यातून आलेले रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार दिलीपराव सोपल व पद्मश्री पुरस्कर्ते रघुवीर खेडकर यांचा सन्मान जयंती समितीच्या वतीने करण्यात आला.

जयसिंह मोहिते पाटील म्हणाले, कलावंत हा टाळ्यांचा भुकेला असतो. तो आत्मविश्वासाने व ताकतीने रंगमंचावर कला सादर करत असतो. रसिकांनीही त्यांना भरभरून दाद दिली पाहिजे.

वैशाली कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र अंबप वठार कोल्हापूर यांनी मुजरा, गवळणी सह वैष्णवी डावाळे हिने काहो लावता जीवा हुर हुर, करू नका सख्या मला दूर आणि बसवा बुलेटवर मला दाजी या सादर केलेल्य लावणीला रसिकांनी दाद दिली.

छाया पूजा श्रद्धा कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र अंबप वठार, राजनंदिनी सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी यवत चौफुला, नटरंग सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी मोडनिंब, प्रिया नगरकर न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र यवत चौफुला, व रुक्मिणी अर्चना जोत्रा वाईकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र वेळे या पार्ट्यांचे रात्री उशिरापर्यंत सादरीकरण सुरू होते. सूत्रसंचालन राजकुमार पाटील, किशोर सूर्यवंशी यांनी केले.

# सहकार महर्षि साखर कारखान्यात सुरक्षा सप्ताह साजरा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यात बुधवार दि. ४ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीमध्ये "राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षितता सप्ताहाचे" आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी सहकार महर्षि व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन कारखान्याचे कार्यकारी संचालक आर. के. चौगुले यांचे शुभहस्ते करण्यात आले. प्रसंगी सी.एस. फडतरे (असि. इंजिनिअर) यांनी सर्व कामगारांना एकत्रितपणे सुरक्षिततेची शपथ दिली. उपस्थित सर्व कामगारांना सेफ्टी संदर्भातील व्हीडीओ फिल्म्स दाखविण्यात आल्या. त्यावेळी सेफ्टी ऑफिसर पी.बी. रणनवरे यांनी सुरक्षा सप्ताहामध्ये तसेच संपूर्ण वर्षभर सुरक्षितता पाळून काम करणेचे आवाहन केले.



त्यानंतर कारखान्याचे कार्यकारी संचालक आर. के. चौगुले यांनी आपल्या भाषणामध्ये ४ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीमध्ये औद्योगिक सेफ्टीबाबत, फायर ट्रेनिंग व पर्यावरण, माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. खासदार विजयसिंह मोहिते-पाटील व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे कुशल नेतृत्वाखाली कारखाना प्रगतिपथावर कार्यरत असून, कारखान्याने आजपर्यंत राज्यपातळीवर व देशपातळीवरील विविध पारितोषिके मिळवणारा, तसेच भारत सरकार कडून सलग आठ वेळेस नॅशनल सेफ्टी ॲवार्ड मिळवणारा कारखाना म्हणून ख्याती मिळविलेली आहे. सुरक्षितता, सुरक्षिततेची गरज, सुरक्षितता व्यवस्थापन, सुरक्षितता साधनांचा वापर, मॉक ड्रील, इलेक्ट्रीकल सुरक्षा, रस्ते सुरक्षा न वैयक्तीक घ्यावयाची काळजी आणि सुरक्षितता याबाबत सर्व कामगारांना सखोल मार्गदर्शन केले. सुरक्षितता सप्ताहनिमित्त कामगारांमध्ये घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेते प्रथम क्रमांक एस.एन. गोडसे, द्वितीय क्रमांक-एस.ए. लोहार, चारोळी स्पर्धेतील विजेते प्रथम क्रमांक डी.एस. चव्हाण, द्वितीय क्रमांक-आर.एल. साळुंखे, तृतीय क्रमांक व्ही. के. गाडे, तसेच घोषवाक्य स्पर्धा प्रथम क्रमांक-आर.डी. रणनवरे, द्वितीय क्रमांक-एस. आर. कुंभार, तृत्तीय क्रमांक विभागुन जे. एरा. कावळे व एस.जी. दोशी यांना प्रशस्तीपत्रक देवून सन्मानीत करण्यात आले.


सदर कार्यक्रमास कारखान्याचे कार्यलक्षी संचालक जे. एम. माने-देशमुख,सेक्रेटरी ए.व्ही. काटे, चिफ इंजिनिअर व फॅक्टरी गॅनेजर एस. के. गोडसे, चिफ अकौंटंट वाय.बी.इनामदार, चिफ केमिस्ट एस.एन. जाधव, शेतकी अधिकारी-आर.एस. चव्हाण, को-जन मॅनेजर-वाय. के. निंबाळकर, परचेस ऑफिसर आर. एस. गायकवाड, टाईम किपर-व्ही.आर. वाघ, पर्यावरण अधिकारी पी.एच. इनामदार, कॉम्प्युटर प्रोग्रामर एस.जी. नरसाळे, सिक्युरीटी ऑफिरार एन. सी. निंबाळकर, कारखान्याचे सर्व कामगार तरोच कामगार युनियन प्रतिनिधी उपस्थित होते. स्वागत व सुत्रसंचालन सेफ्टी ऑफिसर पी.बी. रणनवरे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन आर. डी. रणनवरे यांनी केले.

# श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याच्या वतीने साखर विक्री सुरू



**वेणुनगर, (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने गुढीपाडवा सणानिमित्त सर्व सभासदांना व सन २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या सर्व ऊस पुरवठादार व कामगारांना २५ किलो पॅकींगमध्ये रुपये ३०/- प्रती किलो या दराप्रमाणे २५ किलो साखर प्रति सभासद, ऊसपुरवठादार व कामगार यांना याप्रमाणे साखर वाटपाचे धोरण आमदार अभिजित आबा पाटील चेअरमन यांचे मार्गदर्शनानुसार संचालक मंडळाने जाहीर केलेले आहे. त्याप्रमाणे बुधवार दि. ०४.०३.२०२६ पासून ते ३१.०३. २०२६ पर्यंत कारखाना साईटवर विठ्ठल कॅन्टीन शेजारी व पंढरपूर शहरामध्ये समृध्दी ट्रॅक्टर शोरुम, कॉलेज रोड, पंढरपूर येथे वाटप चालू राहील. तसेच मंगळवेढा, मोहोळ, माळशिरस व सांगोला येथील ऊस पुरवठादार यांनी पंढरपूर येथील साखर वाटप केंद्रातून साखर कुपनवरती नमुद केलेल्या मुदतीमध्ये साखर घेवून जावी. तसेच माढा, करमाळा, बार्शी व परांडा गेटकेन ऊस पुरवठादार शेतकऱ्यांसाठी ०१) माढा विभाग शेटफळ रोड, माढा, ०२) करमाळा व टेंभुर्णी विभाग : शिवसंकल्प गौरी प्लाझा, हॉटेल सुमित समोर, टेंभुर्णी, ०३) NDYT विभाग मौजे लऊळ गट ऑफिस, पंढरपूर-कुडुर्वाडी रोडवर, NDYT येथे साखर वाटप केंद्र चालु केलेले असून सदर केंद्रातील साखर वाटप दि. ०५.०३.२०२६ ते १८.०३.२०२६ पर्यंत साखर चालु राहिल. वरील साखर वाटप केंद्र हे सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० व दुपारी १.३० ते सायं. ५.३० या वेळेमध्ये चालू राहतील. तसेच सध्या कारखान्याचा ऑफ सिझन चालू असल्यामुळे दर शनिवार, रविवार या दिवशी सुट्टी असल्याने व इतर जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्या दिवशीही साखर दुकान बंद राहील, पंढरपूर येथील साखर वाटपाच्या केंद्राचे उद्घाटन श्री विठ्ठल कारखान्याचे ज्येष्ठ संचालक दिनकर दाजी चव्हाण, श्री संत मुक्ताबाई मठाचे व्यवस्थापक शशिकांत पाटील, वास्तुशिल्प चे मालक व निशीगंधा बँकेचे चेअरमन आर. बी. जाधव, सेवा निवृत्त कार्यकारी अभियंता तथा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर काशिद, आनंदबापु पाटील, श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल व गजानन मेडिकलचे मालक गजाननबापू बागल यांचे शुभहस्ते करण्यात आले. तसेच कारखाना साईटवरील साखर वाटप केंद्राचे उद्घाटन संचालक प्रविण कोळेकर व सिध्देश्वर बंडगर, वर्क्स मॅनेजर यु. के. तावरे, चिफ केमिस्ट बी. आर. माने, लिगल ऑफिसर ओ.जे. अवधुत, चिफ अकौंटंट ओ. एस. शिंदे, शुगर सेल अधिकारी महेश घाडगे, हेड टाईम किपर एस. एस. जगताप व इतर अधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाप्रसंगी कारखान्याचे, सर्व सभासद, ऊसपुरवठादार, ठेकेदार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तरी सर्व सभासद यांना विनंती की, कुपनाशिवाय साखर मिळणार नाही व कुपनावरती नमुद केलेल्या मुदतीमध्ये साखर घेऊन जावे.

# स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणची अवैध दारुधंदयावर कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मौजे मुळेगांव तांडा, गुळवंची तांडा, कामती, जवळा ता. सांगोला इत्यादी ठिकाणी दारुबंदी कायदयाखाली एकूण 07 केसेस करुन एकूण 7,800 लि. गुळमिश्रीत रसायन, 58 लिटर हा.भ. दारु, 25 लिटर शिंदी, 141 देशी दारुच्या बाटल्या असा एकूण 3,87,020/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना सोलापूर ग्रामीण जिल्हयामध्ये होळी व धुलीवंदनच्या पाश्र्वभूमीवर अवैध दारुनिर्मिती व दारुविक्री होणाऱ्या ठिकाणी छापे मारुन अवैध दारुच्या भट्टया नष्टकरुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील दुय्यम अधिकारी व अंमलदार यांना अवैध दारुधंदयावर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे सपोनि भाऊसाहेब गोसावी, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक मुजावर यांचे पथक मौजे मुळेगांव तांडा ता. दक्षिण सोलापूर व मौजे गुळवंची ता. उत्तर सोलापूर येथील हातभट्टी दारुनिर्मितीच्या 02 ठिकाणी छापेमारुन 39 बॅरेल मधील एकूण 7,800 लिटर गुळमिश्रीत रसायन जागीच नष्टकरुन एकूण 03 आरोपींविरुध्द सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे 02 गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तसेच कामती पोलीस ठाणे हद्दीत एकूण 02 केसेस करुन 53 लिटर हातभट्टी दारु, 25 लिटर शिंदी, तसेच मौजे जवळा ता. सांगोला येथे एकूण 03 केसेस करुन एकूण 141 देशी दारुच्या बाटल्या व 05 लिटर हातभट्टी दारु जप्त करुन कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेने अवैध दारुधंदयावरील कारवाईमध्ये एकूण 07 केसेस करुन 7,800 लिटर गुळमिश्रीत रसायन, 58 लिटर हातभट्टी दारु, 25 लिटर शिंदी व 141 देशी दारुच्या बाटल्या असा एकूण 3,87,020 रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन 11 आरोपीतांविरुध्द दारुबंदी कायदयाखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि भाऊसाहेब गोसावी, पोलीस उपनिरीक्षक कुलदिप सोनटक्के, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर यांचे पथकाने कामगिरी बजावली आहे.